संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९७/२०२४

नि.क्रं.१६/सी

**<u>सरकारी पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ शपथेवर कथन करतो की</u>-**

माझे नाव - सुनिल जनार्दन कांबळे

वय - ५५ वर्षे, व्यवसाय- मजुरी

राहणार - राधानगरी, ता: राधानगरी, जि: कोल्हापूर

**<u>सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. कांबळे यांचे मार्फत -</u>**

**१.** मी पंचनामेकरीता कुठे गेल्याचे मला आठवत नाही. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र.२ वर माझी सही असून त्यातील मजकूर माझे माहीतीचा नाही. सही **नि.१७/PW ३** देण्यात येते.

**साक्षीदाराने अभीयोग पक्षास सहकार्य न केलेने विशेष सरकारी अभीयोक्ता श्री. एस. बी. कांबळे यांनी साक्षीदारास उलटतपासणीत विचारले जाणारे सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देणेत आली.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि.३०/०३/२०२४ रोजी मी पोलीसांसोबत निपाणी ते राधानगरी रोडवरील राधानगरी एस.टी स्टन्ड समोर पंचनामे करीता गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी MH-09-FZ5063 या मोटर सायकलवर दारू पिलेल्या अवस्थेत मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, सदरील जागेचा पंचनामा माझे समक्ष करणेत आला. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा वाचून मी त्याच्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा माझे समोर होवून देखील मी आरोपीला वाचविण्याच्या उद्देशाने आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ वकील श्री. बी. पी. पाटील यांचे मार्फत नाकारणेत आला.**

**उलटतपास नाही.**

**फेरतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

राधानगरी (एन. पी. काकडे)

दिनांक.२९/१२/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी.